# खाद्य यात्रा
# गणपतीसाठी नैवेद्य
# खांडवी

**साहित्य -**



१) १ वाटी तांदळाचा रवा

२) अर्धी वाटी चिरलेला गूळ

३) २ टेबलस्पून साजूक तूप

४) ५-६ केशराच्या काड्या

५) चिमूटभर वेलची पावडर

६) दोन-अडीच वाटी गरम पाणी

७) २ टेबलस्पून किसलेले सुके खोबरे

**कृती -**

प्रथम साजूक तुपावर तांदळाचा रवा खमंग भाजून घेणे. रवा भाजल्यावर त्यात गरम पाणी घालून ५/७ मिनिटे वाफ आणणे. गूळ, केशराच्या काड्या व वेलची पावडर घालून पुन्हा एकदा वाफ देऊन गॅस बंद करणे.

एका ताटाला तूप लावून हा तांदळाचा शिरा ताटात पसरणे. त्यावर सुके खोबरे भुरभुरुन त्याच्या वड्या पाडणे.

**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**
**asdssd@gmail.com**